

# मा. सु. पा.कला.विज्ञान व कै.पां.ठा. वाणिज्य महविद्यालय, मानोरा

## बि.ए. भाग १,२,३

## विषय : संगीत शिक्षण

## प्रस्तुतकर्ती : सौ. एस.एस. साधु

# संगीत शिक्षण

## १.  संगीत शिक्षण म्हणजे काय ?

संगीत शिक्षणाची नेमकी व्याख्या करताना असे म्हणता येईल की, व्यक्तीला निसर्गदत्त प्राप्त झालेल्या स्वर,ताल,लय या प्रतिभासुप्त गुणांचा प्रगत संगीतशास्त्र व कला यांच्या संदर्भात योग्य तो विकास घडवुन आणून तो कलात्मक पातळीवर पोचवून अशा प्रकारचे संगीत प्रात्याक्षिक करण्यासाठी कुवत त्या व्यक्तीमध्ये निर्माण करणे की ज्या योगे

त्याच्या व्यक्तीगत साधनेतून त्या व्यक्तीला आपली कला बहुजनसुखाय करता येईल.

## २. मानवी जीवनात संगीताचे महत्व

**संगीत ही मानवाच्या जीवनातील संस्काररूपी शिदोरी आहे. यज्ञापासून दहनापर्यंत इतीहासात देखील संगीत वावरताना दिसते.किंबहुना चंचल मनाला एकाग्र करण्यापासून नादब्रम्हाची उपासना करता करता त्याला मोक्षप्राप्ती अथवा ईश्वरप्राप्ती कसन देणे इतके मानवी जीवनात संगीताचे महत्व मानले गेले आहे.याहीपेक्षा संगीतातील सौंदर्याच्या जानिवेतून त्याच्या मनाला जो चिरंतन आनंद आणि समाधान मिळते. त्याचे वर्णन  शब्दातीत आहे.**

मनोरंजना पासून उद्रबोधक अजनापर्यंत संगीत मानवाला सर्वतोपरी उपयुक्त आहे वैयक्तीक आणि सामाजिक तसेच सांस्कृतीक उत्थानापासून मानवा- मानवातील वांशिक, राष्ट्रीय आणि धार्मीक भेद मिळवून राष्ट्रात दिलजमाई करण्याचे काम संगीताइतके प्रभावी रित्या कोणीही करू शकत नाही.

## ३. संगीतशिक्षणाची पारंपारिक पध्दती

संगीत शिक्षणाच्या बाबतीत पाहता गुरूशिष्य परंपरा अशीच पूर्वप्रस्थापीत होती या कलेचे माध्यमस मुळात ध्वनीनाद श्रवनबोधी असल्या मुळे या विदयाला श्रवनविद्या म्हणून संबोधले जाईल आज आपण दुसऱ्या भाषेत संगीताला गुरूमुखि विदया याच नावाने ओळखतो

गुरूकुल पध्दतीच्या शिक्षणात तात्विक चर्चावर विशेष भर नव्हता  या उलट क्रियात्मक पक्षावर जास्त भर दिला जाऊन गायक, वादक ,कलाकार, तयार करणे हेच त्या शिक्षणाचे अंतिम ध्येय होते.

## ४. बदलत्या सामाजिक गरजांच्या पार्श्वभूमीवर संस्थानिहाय पातळीवरील गरज

आज बदलल्या सामाजिक परिस्थितीत संगीतशिक्षणाची गरज निरनिराळ्या प्रकारे वाढलेली दिसते. आज समाजाच्या संगीतीक वैज्ञानिक आणि सौंदर्यात्मक अभ्यासाची गरज बदलत्या परिस्थीतीत निर्माण झाली आहे. कलाकार गायक, वादक तर हवेच आहे. त्याही बरोबर संगीत शास्त्री, संगीत समीशक आणि मनस्वी व मर्मज्ञ श्रोते तसेच संगीत शिक्षक इ अनेक पातळीवर संगीताची गरज वाढत चालली आहे.

## ५. संगीतशिक्षण व्यवसायाथिमुख करण्यासाठीचे मार्ग

१. पदव्युत्तर संगीत शिक्षणा नंतर ज्याना आर्थीक पाठिंबा उत्तम आहे.त्यांनी लोकरंजनासाठी रागदारी बरोबर ठुमरी,दादरा,टप्पा यांन सारखे उमशास्त्रीय संगीत वा अंभग भावगीते आदी सुगमसंगीत शिकुण आपले गायन चौफेर - चौरंगी करावे.

२. रेडीओ, टि. व्ही. आदी माध्यमात शिरकाव मिळेल असे पहावे.

३. समीक्षा उत्तम लिहिता येईल यासाठी ज्ञानाची खोली वाढवावी व परखड विचारसरणीतून कार्यक्रमांचे अनुभवा लोकन श्रोत्यांसमोर मांडावे.



४. उत्तम निवेदन होण्यासाठीचे चातुर्य संपन्न करावे.

५. पाश्चात्य संगीताचे ज्ञान प्राप्त करून नवीन फ्यूजन क्षेत्राकडे वळता येते.

६. संगीत व मानसोपचार / संगीत व मनोविज्ञान/संगीत व व्हॉईस कल्चर (voice culture) संगीत व संगणक आणि प्रयोग ही क्षेत्रे नव्याने उदयाला येत आहेत , त्यांचा मागोवा घ्यावा

अशा प्रकारे अन्य - अन्य पदव्युत्तर शिक्षणाच्या आनंद व उदरभरणाचा मार्ग सहज प्राप्त करता येतो.


प्रस्तुतकर्ती
सौ.एस.एस.साधु